# वाचनप्रेरणा सप्ताह २०१७

## दि. ९ ते १४ ऑक्टोबर

# अहवाल

ज्ञानगंगा घरोघरी


**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक**

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७, २२३३६७७

वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac

## वाचन प्रेरणा दिन – सप्ताह



# प्रास्ताविक

भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती निमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये १३ ऑक्टोबर-वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने विद्यापीठ ग्रंथालयात ९ ते १४ ऑक्टोबर असा वाचन प्रेरणा दिन सप्ताह साजरा करण्यात आला. दिनांक ९/१०/२०१७ रोजी ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्रामध्ये डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचेवरील व इतर वैविध्यपूर्ण पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्याचा मान मा.कुलगुरू महोदयांनी बी.बी.ए.विद्यार्थिनी आफरीन अली यांना दिला. प्रदर्शनपर मार्गदर्शन करताना मा.कुलगुरू यांनी विद्यार्थी व शिक्षकांना संबोधित केले.मा.कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांनीही मार्गदर्शन केले.

दिनांक १०/१०/२०१७ रोजी वाचन प्रेरणा दिवस व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी साप्ताहिक नगराचे संपादक प्रा.विनोद गोरवाडकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. गोरवाडकर यांनी वाचन संस्कृती या विषयावर व्याख्यान सादर केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ.राजेंद्र वडनेरे व्यासपीठावर उपस्थित होते.

दिनांक ११/१०/२०१७ रोजी वाचन प्रेरणादिन सप्ताहानिमित्त गंगापूर येथील दे.ना.पाटील माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सहलीचे नियोजन करून विद्यापीठ ग्रंथालयातील प्रदर्शनाला भेट घडवून आणली.तसेच विद्यार्थ्यांचे वाचन प्रेरणे संदर्भातील मनोगते कार्यक्रमात सादर करण्यात आली.यावेळी व्यासपीठावर नियोजन अधिकारी डॉ.हेमंत राजगुरू व प्र.जनसंपर्क अधिकारी श्री.संतोष साबळे हे उपस्थित होते.

दिनांक १२/१०/२०१७ रोजी बुक-टॉक चे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी श्री.दयानंद हातीव्रे,श्री.सचिन तरटे,श्वेता जाधव व प्रेमलता दाभाडे यांनी सादरीकरण केले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री.माधव पळशीकर ,संचालक,संगणक विद्याशाखा हे उपस्थित होते.तसेच डॉ.उमेश राजदेरकर हे ही व्यासपीठावर उपस्थित होते.

दिनांक १५/१०/२०१७ रोजी मा. डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. मा. कलाम साहेबांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.डॉ. सुनील कुटे , विभागप्रमुख व प्राध्यापक ,स्थापत्य अभियांत्रिकी विद्याशाखा,के.के.वाघ कॉलेज,नाशिक हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांचेसह निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ.राजेंद्र वडनेरे उपस्थित होते.डॉ.भोंडे यांनी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा आढावा घेऊन वैज्ञानिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीवर आपले विचार मांडले,व वाचनाचे महत्व स्पष्ट केले.डॉ.कुटे यांनी वाचन,वाचन संस्कृती आणि जीवन व उत्कर्ष यांचा संबंध जोडत उपस्थितांना वाचनाचे महत्व पटवून दिले.

ग्रंथालय प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे यांनी वाचन प्रेरणा दिन सप्ताह निमित्ताने झालेल्या कार्यक्रमाचा आढावा सादर करून प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्याचबरोबर दृक-श्राव्य विभागातील सर्व सहकारी, प्र.जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे, तसेच श्रीमती.प्राजक्ता देशमुख, श्री. राजेश सर्वे व ग्रंथालयातील सहकारी सहायक ग्रंथपाल श्री.प्रकाश सर्वे, श्रीमती ललिता टोपे, श्री.परशराम पालवी, श्री.अनंत जोशी यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी करता आला.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, संशोधक विद्यार्थी आय.टी.आय प्रशिक्षणार्थी, बी.बी.ए. व पीएच.डी. शिक्षणक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमासंदर्भातील वृत्तपत्रातील प्रसिद्धी, छायाचित्रे सोबत जोडली आहेत. कार्यक्रमांचे चित्रीकरण डीव्हीडी मध्ये देण्यात आलेले आहे

डॉ.दिनेश भोंडे

कुलसचिव





अध्यापन आणि संशोधन विद्यापीठाच्या महत्वाच्या बाबी असून, त्यात ग्रंथालयाची भुमिका महत्वाची ठरते. ग्रंथालयातील ग्रंथसंपदा हीच त्याची समृद्धी असते. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कितीही प्रगती झाली, तरी वाचन आणि संशोधनाशिवाय ती अपूर्ण आहे म्हणून विद्यार्थ्यांनी वाचनावर लक्ष केंद्रित करुन संशोधन, गुणवत्तावाढीवर भर द्यावा.

-कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक


## वाचन प्रेरणा दिन – सप्ताह




व्याख्यानात आपले विचार व्यक्त करताना शालेय विद्यार्थीनी



व्यासपीठावर उपस्थित संचालक डॉ. राजेंद्र वडनेरे, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, प्रमुख ग्रंथपाल डॉ. मधुकर शेवाळे आणि प्रा. सुनिल कुटे





मा. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन आणि प्रमुख, ग्रंथपाल डॉ. मधुकर शेवाळे आणि सहायक ग्रंथपाल प्रकाश बर्वे



आभार व्यक्त करतांना प्राजक्ता देशमुख व व्यासपीठावर उपस्थित संचालक डॉ. राजेंद्र वडनेरे, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, प्रमुख ग्रंथपाल डॉ. मधुकर शेवाळे आणि प्रा. सुनिल कुटे



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

वाचन प्रेरणा दिन – सप्ताह





व्यासपीठावर आपले विचार व्यक्त करतांना प्रा. विनोद गोरवाडकर
व्यासपीठावर उपस्थित संचालक डॉ. राजेंद्र वडनेरे, प्रमुख ग्रंथालय डॉ. मधुकर शेवाळे



वर्तमानपत्रातील कात्रणे

# विद्यार्थ्यांनी वाचनावर करावे लक्ष केंद्रित

## कुलगुरू डॉ. ई. वायुनंदन : मुक्त विद्यापीठात वाचन प्रेरणा दिन



**Nashik FIRST** *Classifieds...*

# 'Students should try to concentrate on reading'

■ Said YCMOU VC E Vayunandan during the 'Reading Inspiration Week' held recently



वाचन प्रेरणा दिन - सप्ताह

## विद्यार्थियों को पढ़ाई पर ध्यान केंद्रित करना जरूरी : कुलगुरु वायुनंदन



## वाचनावर लक्ष केंद्रित करावे



## विद्यार्थ्यांनी वाचनावर लक्ष केंद्रित करावे : वायुनंदन

## मुक्त विद्यापीठातर्फे वाचनाच्या फायद्यांवर प्रकाशझोत

प्रतिनिधी, नाशिक



वाचन प्रेरणा दिन — सप्ताह



# विद्यार्थ्यांनी वाचनाकडे लक्ष द्यावे : कुलगुरू वायुनंदन


## मुक्त विद्यापीठात वाचन प्रेरणा सप्ताहास प्रारंभ




# पुस्तकांतूनच जीवन जगण्याचे बळ : प्रा. कुटे


## मुक्त विद्यापीठात वाचन प्रेरणा सप्ताहाचा समारोप







यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



मा. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन आणि प्रमुख, ग्रंथालय डॉ. मधुकर शेवाळे




ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी मा. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, वित्त अधिकारी श्री. मगन पाटील, प्रमुख, ग्रंथालय डॉ. मधुकर शेवाळे आणि विद्यार्थी






ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी वित्त अधिकारी श्री. मगन पाटील, संचालक उमेश राजदेरकर ,मा. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, प्रमुख ग्रंथालय डॉ. मधुकर शेवाळे




ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी वित्त अधिकारी श्री. मगन पाटील, संचालक उमेश राजदेरकर ,मा. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, प्रमुख ग्रंथालय डॉ. मधुकर शेवाळे


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक




व्याख्यानास उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थी




व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना प्रा. सुनिल कुटे



व्याख्यानास उपस्थित विद्यार्थी




व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना प्रा. सुनिल कुटे



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# वाचन प्रेरणा दिन – सप्ताह



व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना शालेय विद्यार्थीनी



व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना डॉ. हेमंत राजगुरु




व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना शालेय विद्यार्थीनी




व्याख्यानास उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थीनी




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक




व्याख्यानास उपस्थित प्राध्यापक आणि विद्यार्थी



व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना प्रा. सुनिल कुटे



व्याख्यानास उपस्थित विद्यार्थी




व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना प्रा. सुनिल कुटे



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## वाचन प्रेरणा दिन – सप्ताह




व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना शालेय विद्यार्थी



व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना प्रमुख, ग्रंथालय डॉ. मधुकर शेवाळे



व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना शालेय विद्यार्थीनी



व्याख्यानात आपले विचार व्यक्त करतांना शालेय विद्यार्थी



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## वाचन प्रेरणा दिन – सप्ताह अहवाल

भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती निमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये १३ ऑक्टोबर-वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने विद्यापीठ ग्रंथालयात ९ ते १४ ऑक्टोबर असा वाचन प्रेरणा दिन सप्ताह साजरा करण्यात आला.

दिनांक ९/१०/२०१७ रोजी ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्रामध्ये डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचेवरील व इतर वैविध्यपूर्ण पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्धघाटन करण्याचा मान मा.कुलगुरू महोदयांनी बी.बी.ए.विद्यार्थिनी आफरीन अली यांना दिला. प्रदर्शनपर मार्गदर्शन करतांना मा.कुलगुरू यांनी विद्यार्थी व शिक्षकांना संबोधित केले.मा.कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांनीही मार्गदर्शन केले.

दिनांक १०/१०/२०१७ रोजी वाचन प्रेरणा दिवस व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी साप्ताहिक नगाराचे संपादक प्रा.विनोद गोरवाडकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. गोरवाडकर यांनी वाचन संस्कृती या विषयावर व्याख्यान सादर केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ.राजेंद्र वडनेरे व्यासपीठावर उपस्थित होते.

दिनांक ११/१०/२०१७ रोजी वाचन प्रेरणादिन सप्ताहानिमित्त गंगापूर येथील दे.ना.पाटील माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सहलीचे नियोजन करून विद्यापीठ ग्रंथालयातील प्रदर्शनाला भेट घडवून आणली.तसेच विद्यार्थ्यांचे वाचन प्रेरणे संदर्भातील मनोगते कार्यक्रमात सादर करण्यात आली.यावेळी व्यासपीठावर नियोजन अधिकारी डॉ.हेमंत राजगुरू व प्र.जनसंपर्क अधिकारी श्री.संतोष साबळे हे उपस्थित होते.

दिनांक १२/१०/२०१७ रोजी बुक-टॉक चे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी श्री.दयानंद हातीब्रे,श्री.सचिन तरवटे,श्वेता जाधव व प्रेमलता दाभाडे यांनी सादरीकरण केले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री.माधव पळशीकर ,संचालक,संगणक विद्याशाखा हे उपस्थित होते.तसेच डॉ.उमेश राजदेरकर हे ही व्यासपीठावर उपस्थित होते.

दिनांक १३/१०/२०१७ रोजी मा. डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. मा. कलाम साहेबांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.डॉ. सुनील कुटे , विभागप्रमुख व प्राध्यापक ,स्थापत्य अभियांत्रिकी विद्याशाखा,के.के.वाघ कॉलेज,नाशिक हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांचेसह निरंतर विद्याशाखेचे संचालक डॉ.राजेंद्र वडनेरे उपस्थित होते.डॉ.भोंडे यांनी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा आढावा घेऊन वैज्ञानिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीवर आपले विचार मांडले,व वाचनाचे महत्व स्पष्ट केले.डॉ.कुटे यांनी वाचन,वाचन संस्कृती आणि जीवन व उत्कर्ष यांचा संबंध जोडत उपस्थितांना वाचनाचे महत्व पटवून दिले.

ग्रंथालय प्रमुख डॉ. मधुकर शेवाळे यांनी वाचन प्रेरणा दिन सप्ताह निमित्ताने झालेल्या कार्यक्रमांचा आढावा सादर करून प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. कुलसचिव डॉ.दिनेश भोंडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्याचबरोबर दृक-श्राव्य विभागातील सर्व सहकारी, प्र.जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे, तसेच श्रीमती.प्राजक्ता देशमुख, श्री. राजेश बर्वे व ग्रंथालयातील सहकारी सहायक ग्रंथपाल श्री.प्रकाश बर्वे, श्रीमती ललिता टोपे, श्री.परशराम पालवी, श्री.अनंत जोशी यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी करता आला.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, संशोधक विद्यार्थी आय.टी.आय प्रशिक्षणार्थी, बी.बी.ए. व पीएच.डी. शिक्षणक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमासंदर्भातील वृत्तपत्रातील प्रसिद्धी, छायाचित्रे सोबत जोडली आहेत. कार्यक्रमांचे चित्रीकरण डीव्हीडी मध्ये देण्यात आलेले आहे.

डॉ.दिनेश भोंडे
कुलसचिव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

१५ ऑक्टोबर

# वाचन प्रेरणा दिन

भारतरत्न

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम**

ज यं ती

## स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन - दि. १५ ऑक्टोबर
## वाचन प्रेरणा दिन — उपक्रम सूची

१. वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर व्याख्यान.

२. वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर चर्चासत्र / परिसंवाद / कार्यशाळा.

३. लेखकांशी त्यांच्या लेखनाविषयी, त्यांच्या कलाकृतींविषयी चर्चा किंवा त्यांची प्रकट मुलाखत.

४. **भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव (भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा)** या उपक्रमाची माहिती विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांना देणे किंवा निवडक विद्यार्थ्यांना घेऊन अभ्यास सहलीचे आयोजन करणे.

५. हे वर्ष कविवर्य **विंदा करंदीकर यांचे जन्मशताब्दी वर्ष** असल्याने विंदांच्या साहित्यावर समर्पक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

६. सुसंगत स्पर्धा (निबंध स्पर्धा किंवा काव्यवाचन स्पर्धा किंवा अभिवाचन स्पर्धा... इत्यादी).

७. विद्यार्थ्यांनी किंवा वाचकांनी आवडत्या पुस्तकाविषयी आणि लेखकाविषयी लेखी किंवा तोंडी मनोगत व्यक्त करणे.

८. वाचन कौशल्याचा विकास या विषयावरील प्रशिक्षण व सादरीकरण.

९. वृत्तपत्रांतील अग्रलेख / प्रमुख लेखांचे वाचन.

१०. ई- बुक्सचे सामूहिक वाचन.

११. निवडक कथा, कविता आणि उतारे यांचे अभिवाचन.

१२. एखाद्या सुप्रसिद्ध पुस्तकातील महत्त्वाच्या / निवडक पानांचे सामूहिक वाचन (पारायण).

१३. प्रकाशक / वितरक / ग्रंथालये यांच्या सहकार्याने पुस्तकांचे प्रदर्शन.

१४. **संकल्प** — महिन्यातील एक दिवस **' नो गॅजेट डे'** म्हणून कृतीत आणण्याचे आवाहन.
(' नो गॅजेट डे'- मोबाईल, व्हॉटस्ॲप, फेसबुक, ट्विटर न वापरता तो वेळ वाचनासाठी देणे.)

१५. सलग काही वेळ (शांतपणे, एकट्याने) वाचनाचा उपक्रम (विद्यार्थी / वाचक एखाद्या वर्गात / सभागृहात बसून एकट्याने पुस्तक वाचतील.)

१६. वाढदिवशी एकमेकांना पुस्तक भेट देण्याचे आवाहन.

१७. वाचन प्रेरणा दिनाचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनी / नागरिकांनी एकमेकांना पुस्तक भेट द्यावे.

१८. शाळा, महाविद्यालय, ग्रंथालय व इतर संस्थांनी आपल्या परिसरात **'डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम वाचन कट्टा'** निर्माण करावा.

१९. **पुष्पगुच्छ नाही पुस्तक** (बुके नाही बुक) - सार्वजनिक कार्यक्रमांत पाहुण्यांना पुष्पगुच्छांऐवजी पुस्तक भेट देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व प्रसार.

२०. वाचन प्रेरणा दिनाच्या बोधचिन्हाचा (लोगोचा) सोशल मीडियाद्वारे आणि रंगीत छापील प्रती काढून प्रसार.

---

**टीप :** आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल **vinodtawdewpd2017@gmail.com** या ई-पत्त्यावर किंवा पत्रात नमूद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.

(वाचन प्रेरणा दिन ३०/१०/१७)


मंत्री

महाराष्ट्र राज्य

**विनोद तावडे**

**मंत्री**

**शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,**
**उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,**
**अल्पसंख्याक विकास व वक्फ**

महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*


दिनांक २९ सप्टेंबर, २०१७

सस्नेह नमस्कार!

भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस (**१५ ऑक्टोबर**) हा **'वाचन प्रेरणा दिन'** म्हणून, गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. **याही वर्षी (२०१७) आपल्याला वाचन प्रेरणा दिन उत्साह आणि गांभीर्यासह साजरा करायचा आहे.**

**दि. १५ ऑक्टोबर रोजी सार्वजनिक सुटी असल्याने, यंदाचा वाचन प्रेरणा दिन हा सर्व शाळा - महाविद्यालये - शैक्षणिक संस्था व शासकीय कार्यालये यांनी शुक्रवार, दि. १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी तसेच, सार्वजनिक व खाजगी ग्रंथालये, साहित्यिक / सांस्कृतिक संस्था यांनी रविवार, दि. १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी साजरा करावा.**

व्यक्तिमत्त्व विकास, साहित्य विकास आणि भाषाविकास यांसाठी वाचन संस्कृतीचा विस्तार आणि विकास करणे अत्यावश्यक आहे. पुस्तकांचं गाव हा अभिनव प्रकल्प, निवडक गटांना ग्रंथपेट्यांचे वितरण, सार्वजनिक कार्यक्रमांत पुस्तके भेट देण्याच्या शासन निर्णयाची आग्रही अंमलबजावणी अशा माध्यमांतून शासन वाचन संस्कृतीबाबत कार्यरत आहेच. या पार्श्वभूमीवर आपण प्रत्येकाने वाचन संस्कृती चळवळीत सहभाग देणे अत्यावश्यक आहे.

**सर्व माध्यमांच्या व सर्व मंडळांच्या (बोर्डांच्या) शाळा, सर्व प्रकारची महाविद्यालये, खाजगी-सार्वजनिक ग्रंथालये, साहित्यिक-सांस्कृतिक संस्था, प्रकाशक-लेखक-पुस्तक वितरक, वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या अशा सर्वच घटकांनी वाचन प्रेरणा दिनी कार्यक्रम-उपक्रम योजावेत, असे आवाहन मी शासनाच्या वतीने करीत आहे.** संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकही या उपक्रमास भरघोस प्रतिसाद देतील, अशी मला खात्री आहे.

सोबत उपक्रम सूची जोडली आहे, आपणही आपल्या कल्पनाशक्तीनुसार नावीन्यपूर्ण उपक्रम योजू शकता. **'उपस्थितांचा (विद्यार्थी / रसिक वाचकांचा) सहभाग' हे सूत्र कार्यक्रम योजताना आवर्जून लक्षात ठेवावे. तसेच हा उपक्रम साजरा करीत असताना परीक्षार्थींना त्रास होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी.**

वाचन प्रेरणा दिनाच्या उपक्रमात आपला सार्थ आणि सक्रिय सहभाग आपण नोंदवालच, या खात्रीसह आपणा सर्वांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**सहपत्र : तपशीलवार उपक्रम सूची**

आपला,

विनोद तावडे

**(विनोद तावडे)**

---

टीप : आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल **vinodtawdewpd2017@gmail.com** या ई-पत्त्यावर किंवा पत्रात नमूद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा

# अपूर्वा जाखडी: नाशिक ते नासा

(2) अमेरिकेतील जगप्रसिध्द (नॅशनल एरोनॉटिक्स ॲण्ड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन) "नासा" ला आयुष्यात एकदातरी भेट द्यावी असं प्रत्येक इंजिनियरचं स्वप्न असतं पण सर्वांनाच ती संधी मिळते असं नाही.नाशिकच्या अपूर्वा डी. जाखडी मात्र अशा भाग्यवान ठरल्या आहेत. अमेरिकेतील अलाबामा येथील "नासा" तसेच "मार्शल स्पेस सेंटर" आणि "यू.एस. स्पेस ॲण्ड रॉकेट सेंटरला" भेट देणाऱ्या नाशिकच्या त्या पहिल्या प्रतिनिधी ठरल्या आहेत.

अपूर्वा जाखडी या अंबड औद्योगिक वसाहतीतील "श्री इंजिनियर्स" च्या संचालिका आहेत.तसेच "दि इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियर्स (इंडिया)" नाशिक शाखेच्या आणि "आयईटीई सब सेंटर" नाशिकच्या अत्यंत क्रियाशील संचालिका आहेत. अवकाश संशोधनात त्यांना पहिल्यापासूनच आवड आहे. नॅशनल स्पेस सोसायटी एनएसएस वॉशिंग्टन. डी.सी. च्या त्या अजीव सभासद आहेत.त्यांनी "आयव्होनिक्स" (एअरक्राफ्ट इलेक्ट्रॉनिक्स) ,मायक्रोवेवज आणि रडार या विषयात विशेष प्राविण्य मिळविले आहे.एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाच्या नाशिक व पुणे येथील विद्यार्थ्यांना त्या वरील विषय आवडीने शिकवितात.

जून 2010 मध्ये नासाचे शैक्षणिक पार्टनर असलेल्या हनीवेल यांनी "नासा" च्या सहकार्याने आयोजित केलेल्या "स्पेस कॅम्प वर्कशॉप" मध्ये अपूर्वाला सहभागी होण्याची संधी मिळाली.या शिबिरात एरोनॉटिक्स ,एव्हिएशन,रॉकेट इंजिनियरींग ,स्पेस सायन्स या विषयांचं प्रशिक्षण दिले जाते.विशेष यंत्रणांव्दारा तयार केलेला चंद्र ,तसेच मंगळावरील गुरूत्वाकर्षणाचा आभासही त्यांना येथे अनुभवता आला.स्वतः रॉकेट तयार करून ते उडविण्याचं प्रात्यक्षिकही त्यांना येथे करायला मिळाले.

"स्पेस कॅम्प वर्कशॉप" दरम्यान नासाचे सुप्रसिध्द माजी ॲस्ट्रॉनटस 'रॉबर्ट गिब्सन','एडवर्ड बुकवी' तसेच 'होमर हिकमॅन ज्युनियर' आणि जर्मन रॉकेटचे पायोनियर 'डॉ.वॉन ब्राऊन' यांना भेटण्याची व त्यांच्याशी चर्चा करण्याची दुर्मिळ संधी मिळाली.

"स्पेस कॅम्प वर्कशॉप" हा जीवन समृध्द करणारा अनुभव होता असं त्या मानतात. ~~मे 2011~~

Social Media च्या माध्यमातूनही त्या क्रियाशील आहेत.

Er. Apurva Jakhadi — Space-Educator

(1) B.E. (Electronics & Communication Engineering) & Chartered Engineering

Gogate Institute of Technology - Belgaum

Spl. Avionics, Satellite Communication, Microwaves & Radar)

(3) Special show - Zilla Parishad School - [illegible] मुलांसाठी यशवंतराव चव्हाण तारांगणमध्ये दि. १५ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता. ~~तारांगणाच्या~~ या तारांगणचा [illegible]

[illegible]